पुढारी | शनिवार २० डिसेंबर २०१४

# दोडामार्ग महाविद्यालयाचे २१ पासून वझरे येथे श्रमसंस्कार शिबिर

**दोडामार्ग : वार्ताहर**

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत निवासी श्रमसंस्कार शिबिर २१ ते २७ डिसेंबर या कालावधीत वझरे येथे होणार आहे.

या शिबिराचे उद्घाटन रविवार २१ डिसेंबर रोजी दु. २ वा. नवनिर्माण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीपाद हळबे, चेअरमन अभिजीत हेगशेटये यांच्या हस्ते होणार आहे. संस्था पदाधिकारी अशोक बेलसरे, मलविंदरसिंग खुराना, मोहन खातू, खलीद दलवाई, सूर्यकांत परमेकर, सभापती महेश गवस, उद्योजक विवेकानंद नाईक, बाबुराव धुरी, सूचन कोरगावकर आदी उपस्थित राहणार आहेत.

सोमवार २२ डिसेंबर रोजी दु. ३ वा. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रकल्प अधिकारी दीपक माने यांचे 'ग्रामीण पर्यटन आणि शासनाची धोरणे', मंगळवार २३ डिसेंबर रोजी दु. ३ वा. गोव्यातील पर्यावरण तज्ज्ञ डॉ. राजेंद्र केरकर यांचे 'पर्यावरण आणि ग्राम स्वच्छता', बुधवार २४ डिसेंबर रोजी डॉ. रामदास रेडकर यांचे 'महिलांचे कुपोषण एक समस्या', गुरुवार २५ रोजी पोलिस उपनिरीक्षक प्रकाश पवार यांचे 'महिला सुरक्षाविषयक कायदे', शुक्रवार २६ डिसेंबर रोजी दु. ३ वा. नेहरू युवा केंद्राचे शिरीष लवांदे यांचे 'व्यक्तिमत्त्व विकास' याबाबत मार्गदर्शन होणार आहे. शिबिराचा समारोप शनिवार २७ डिसेंबर रोजी होणार आहे. या कार्यक्रमास माजी मंत्री प्रवीण भोसले, सुरेश दळवी, वझरे सरपंच सागर गवस, ग्रामसेवक सौ. शिल्पा रेडकर उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. यु. दरेकर, प्रा. आर. ए. मोरे कार्यक्रमाची जबाबदारी पार पाडणार आहेत. शिबिरामध्ये वनराई बंधारे बांधणे, रस्ते बांधणे, साफसफाई, महिला मेळावा, सांस्कृतिक कर्यक्रम, शालेय विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन, वीज बचत सर्व्हे, गावातील विविध समस्यांवर सर्व्हेक्षण प्रकल्प आदी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या शिबिराला उपस्थित रहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले आहे.